राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत (NUHM) आपला दवाखाना प्रकल्पाला "आदरणीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना प्रकल्प" असे नाव देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः NHM-२०१९/प्र.क्र.१६८/आरोग्य-७**
गोकुळदास तेजपाल रूग्णालय आवार, संकूल इमारत,
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ०५ मार्च, २०१९.

**संदर्भ :-**

आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.रा.आ.सो.मुं/रानाआअ/आपला दवाखाना/१११५०९/२०१८-१९, दि. ०१ मार्च, २०१९.

**प्रस्तावना :-**

महानगरपालिका क्षेत्रातील काही झोपडपट्टया नागरी आरोग्य प्राथमिक केंद्रापासून दूर असल्यामुळे आरोग्य सेवांपासून वंचित राहत आहेत. अशा भागांना आरोग्य सेवा पुरविण्याकरीता नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत "आपला दवाखाना" योजना ११ महानगरपालिकांमध्ये राबविण्याकरीता सन २०१९-२० च्या प्रकल्प अंमलबजावणी आराखडयामध्ये (PIP) केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने केंद्र शासनाने ६० "आपला दवाखाना" करीता मंजुरी दिली आहे. सदर दवाखाना नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून दूर असलेल्या ५००० ते १०००० झोपडपट्टी लोकसंख्याकरीता मुलभूत उपचारात्मक व प्रतिबंधात्मक तसेच संदर्भ सेवा प्रदान करणार आहेत. तरी सदर आपल दवाखाना प्रकल्पास "आदरणीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना प्रकल्प" असे नाव देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी भागात नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रापासून दूर असल्यामुळे आरोग्य सेवांपासून वंचित राहत असलेल्या भागांना आरोग्य सेवा पुरविण्याकरीता राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रांमध्ये राबविण्यात येणाऱ्या "आपला दवाखाना" या प्रकल्पाचे "आदरणीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना प्रकल्प" असे नामाभिधान करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०११०२५०१२६१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILESH MADHUKAR FALAKE

Digitally signed by NILESH MADHUKAR FALAKE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9b937361525edcb194dec2d7985fb077e5abd6b9fad45b976539bce4d36b0b69, postalCode=400001, street=10TH FLOOR,G T HOSPITAL COMPLEX,NEW MANTRALAY,MUMBAI, serialNumber=e09d55875f0b34f40ea67d594e0e55772eb9527cde52579d6523580dfc4d1783, ou=PHD MANTRALAYA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NILESH MADHUKAR FALAKE
Date: 2019.03.05 11:12:11 +05'30'

**( निलेश फाळके )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग (सर्व)
५) आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
६) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
७) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
८) सहसंचालक (असंसर्गजन्य रोग), आरोग्य सेवा, मुंबई.
९) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
१०) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
११) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
१२) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
१३) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
१४) निवडनस्ती (आरोग्य-७)